॥ या विश्वा या विनुवाने ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

Phone: (02462) 215246

## NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

website: srtmun.ac.in

E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५-२६/२५०

दिनांक : २९/११/२०२५

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: ०१ डिसेंबर हा दिवस "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करणे बाबत.
संदर्भ: मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय मुंबई यांचे जा.क्र.रासेयो-२०२५/प्र.क्र.११५/रासेयो कक्ष दिनांक २८ नोव्हेंबर २०२५

महोदय,

उपरोक्त विषयी मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय मुंबई यांनी संदर्भिय पत्रान्वये केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांच्या निर्देशानुसार दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी साजरा केला जाणारा जागतिक एड्स दिन, जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) प्रथम १ आपत्कालीन सेवांमध्ये एचआयव्ही/एड्स या आजाराबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यासाठी स्थापन केला होता. हा दिवस उपचारांची उपलब्धता, या आजाराचा प्रतिबंध करण्यासाठी आणि या रोगाचा अंत करण्यासाठी आणि या रोगाचा अंत करण्यासाठी जागतिक उद्दिष्टे साध्य करणे यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी विकसित झाला आहे. आणि तो UNAIDS सारख्या संस्थाद्वारे समन्वयित केला जातो. हा दिवस विविध कार्यक्रम, शैक्षणिक मोहिमा आणि एकता दर्शविण्यासाठी प्रतीकात्मक लाल रिबन बांधून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातून दिनांक ०१ डिसेंबर हा दिवस "जागतिक एड्स दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. एड्स या आजाराच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्याकरिता आपण आपल्या स्तरावर एड्स या आजाराविषयी महाविद्यालयीन घटक व समाजात व्यापक स्वरूपात जनजागृती मोहिम, एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, इ. विविध उपक्रमांचे आयोजन आपल्या स्तरावरून दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याबाबत कळविले आहे.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की  केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांच्या निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी "जागतिक एड्स दिन" निमित्त या आजाराविषयी महाविद्यालयीन घटक व समाजात व्यापक स्वरूपात जनजागृती मोहिम, एकता रॅली, प्रश्नमंजुषा, भाषण स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, इ. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे व आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल, फोटो रा.से.यो. विभागाच्या nss@srtmun.ac.in या ई-मेल वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

प्रा. डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner